श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

## जाहिर दरपत्रक

दि. २९/१२/२०२५

**विषय :–** फोटो तयार करणेकामी सिथेंटीक फ्रेमचा पुरवठा करणेबाबत.

श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूरचे नवीन स्वरूपातील श्री. विठ्ठल रूक्मिणी मातेचे चित्रांचे हॉटप्रेस व लॅमिनेशन करून फोटो तयार करणेकामी आवश्यक असणारे सिथेंटीक फ्रेमचे पुरवठा करण्यासाठी दरपत्रके मागविण्यात येत आहेत. तरी आपलेकडील छापील बिलावर सही व शिक्क्यासह दरपत्रक दि.१२/०१/२०२६ रोजी सायं ५.०० वाजेपर्यंत या कार्यालयाकडे सिलबंद लिफाप्यात सादर करावे.सिलबंद पाकीटावर खालील तपशिल नमुद करावा.

'' सिथेंटीक फ्रेमचा पुरवठा कामाचे दरपत्रक''

पुरवठाधारकाचे पूर्ण नाव, पत्ता व मोबाईल कमांक

उशिरा प्राप्त होणाऱ्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही. सोबत दरपत्रक माहिती, अटी व शर्तीची प्रत जोडली आहे.

कार्यकारी अधिकारी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

स्वा/–
व्यवस्थापक,
श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर, जि. सोलापूर.

Scanned with OKEN Scanner

## श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

### दरपत्रक अर्ज

प्रति,

मा.कार्यकारी अधिकारी,
श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर, जि. सोलापूर.

विषय:– सिथेंटीक फ्रेम २०२६ ते २०२७ गरजेनुसार पुरवठा करणेकामी निविदा.

ठेकेदाराचे पूर्ण नाव :– श्री.-------------------------------

पूर्ण पत्ता :– -------------------------------

-------------------------------

मोबाईल कं.:– -------------------------------

श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिर समिती, पंढरपूरचे सिथेंटीक फ्रेम पुरवठा करणे कामाच्या श्री.संत तुकाराम भवन येथील सुचना फलकावर दि.०५/०१/२०२६ प्रसिध्द झालेल्या निविदे प्रमाणे आमच्याकडे उपलब्ध असलेल्या स्वच्छता साहित्याचे दरपत्रक खालीलप्रमाणे सादर करीत आहे.

| अ. क्र. | पुरवठा करावयाच्या वस्तूचा तपशील | कालावधी | परिमाण | दर / रक्कम | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | अंकी | अक्षरी |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | २८x४०एम.डी.एफ. ५एम.एम. २इंची फ्रेम | २०२६ ते २०२७ | प्रति नग | | |
| २ | २०x२८एम.डी.एफ. ५एम.एम. २इंची फ्रेम | | प्रति नग | | |
| ३ | १८x२४एम.डी.एफ. ५एम.एम. २इंची फ्रेम | | प्रति नग | | |
| ४ | ६ x ८एम.डी.एफ. ५एम.एम. १इंची फ्रेम | | प्रति नग | | |

वरील दर प्रत्यक्ष साईज व कंपनीप्रमाणे सिथेंटीक फ्रेमचा वाहतुक खर्चा सहित १ वर्षा पर्यंतच्या कालावधीत सिथेंटीक फ्रेमचा पुरवठा करणेस मी बांधील राहील, तसेच याबाबतच्या आपणाकडून देण्यात

कार्यकारी अधिकारी
श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

आलेल्या अटी व शर्ती मला मान्य असून त्यासंबंधीचे जरूर ते प्रतिज्ञापत्र रू.१००/- च्या स्टॅम्पपेपरवर करून देण्यास तयार आहे. तरी वर नमुद दरपत्रकाप्रमाणे सिथेंटीक फ्रेमचा पुरवठा करणेचे काम मला मिळण्यास विनंती आहे.

दिनांक / /२०२६ पुरवठाधारकाची सही व शिक्का

<u>सोबत खालील कागदपत्रे जोडलेली आहेत</u>

१. स्वत:च्या ओळखपत्राची झेरॉक्स प्रत. (उदा. पॅनकार्ड, मतदान कार्ड व आधारकार्ड)
२. जीएसटी प्रमाणपत्रे
३. मुंबई दुकाने व संस्था अधिनियमामध्ये असलेला परवाना.
४. पॅन कार्ड.
५. निविदा शुल्क,बयाना रक्कम रोखीने भरलेलेची जमा पावती किंवा डि.डि.




Scanned with OKEN Scanner

## अटी व शर्ती

१.मंजूर दराने पुरवठादाराने मंदिर समितीच्या मागणीप्रमाणे सिंथेटिक फ्रेम 5mm MDF बोर्ईसह पुरवठा करणे आवश्यक आहे.

२.मंदिर समितीने ठरवून दिलेल्या अथवा निचित केलेल्या प्रमाणात फ्रेमचा पुरवठा करणे.

३.सिंथेटिक फ्रेम 5mm MDF बोर्ईसह चांगल्या गुणवत्तेचे असणे आवश्यक आहे.

४.पुरवठा करण्यात येणाऱ्या सिंथेटिक फ्रेम 5mm MDF दर्शन मंडप येथे जागेवर पोहोच करण्याचे आपणास बंदनकारक राहील.

५.सदर सिंथेटिक फ्रेम 5mm MDF बोर्ईसह मंदिर समितीच्या मागणीनुसार मुदतीत करणेचा आहे.त्यास विलंब झालेस आपणास जबाबदार धरून मालाच्या किमतीच्या ५ टक्के पर्यत दंड आकारण्यात येईल.

६.सदर सिंथेटिक फ्रेम 5mm MDF बोर्ई खराब असल्याचे आढळून आलेस आपणास जबाबदार धरणेत येईल व त्याचे बिल अदा केले जाणार नाही.

७.पुरवठा करण्यात आलेल्या सिंथेटिक फ्रेम 5mm MDF बोर्ईची प्रत व प्रमाण संबंधित विभागाकडून मोजणी व तपासणी करून खात्री झाले खेरीज बिल अदा केले जाणार नाही.

८. सदर सिंथेटिक फ्रेम 5mm MDF बोर्ईसह पोहचविण्याचा वाहतूक खर्च,हमाली अथवा इतर अतिरिक्त कोणताही खर्च आपणास दिला जाणार नाही.

९.सादर कामाचे मंजूर दराव्यतिरिक्त कोणताही कर अदा केला जाणार नाही.तसेच सादर कामाचे बिल अदा करताना नियमानुसार २ टक्के आयकर कपात केली जाईल.

१०. सदर सिंथेटिक फ्रेम 5mm MDF बोर्ईसह पुरवठा वाहतुकी दरम्यान झालेल्या कोणत्याही दुर्घटनेस पुरवठाधारक जबाबदार राहील.तसेच वाहतूकी मध्ये फ्रेम खराब झालेस त्यासाठी मंदिर समिती जबाबदार राहणार नाही.

११.समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटीत जे बदल करेल ते आपणास बंदनकारक राहील.

१२.सदर कामासंबंधी काही वाद उद्भवल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

१३.दरपत्रक मंजुरी आदेशापासून १ वर्ष कालावधीसाठी मंजूर दराने पुरवठा करणेस बंदनकारक राहील.

१४.वरील कोणत्याही एका अटी व शर्तीचा भंग झालेस आपणास जबाबदार धरणेत येईल व मंजूर निविदा कोणत्याही क्षणी रद्द केली जाईल.

१५.प्रशासकीय व अन्य कारणास्तव मंजूर दरपत्रक कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अथवा कामामध्ये बदल करण्याचा अधिकार कार्यकारी अधिकारी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती पंढरपूर यांनी राखून ठेवलेला आहे.

१६.आपण रु.१००/- चे स्टॅमपेपरवर सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे प्रतीज्ञापत्र करून देणे आवश्यक आहे.सदरचे प्रतीज्ञापत्र या कार्यालयाकडे जमा केल्याशिवाय पुरवठा कामाची बिले अदा केली जाणार नाहीत.

कार्यकारी अधिकारी,
विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर, जि. सोलापूर.

Scanned with OKEN Scanner